**ठळक बातम्या**

- बिहारमधे झालेल्या मतदारयाद्यांच्या सखोल पुनरिक्षणाच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालयाचं शिक्कामोर्तब

- देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त देशाची आदरांजली

- आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम यंदा कोलकाता इथं होणार

- गाझा शहरावर काल इस्राएलनं केलेल्या हल्ल्यात हमासचे लष्करी कमांडर मोहम्मद ओदाह यांचा मृत्यू

- नीट पेपरफुटीप्रकरणी सीबीआयकडून पुणे आणि लातूर इथून आणखी दोघांना अटक

**आणि**

- केरळात मोसमी पावसाचं आगमन लांबणीवर

**<><><><><>**

SIR अर्थात मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाच्या प्रक्रियेच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालयाने आज शिक्कामोर्तब केलं.

गेल्यावर्षी बिहारमधे पुनरीक्षण प्रक्रिया राबवण्यासाठी काढलेल्या अधिसूचनेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली, त्यावेळी न्यायालयाने हा निर्णय दिला. जन प्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम ३२४ नुसार निवडणूक आयोगाला पुनरीक्षण प्रक्रिया राबवण्याचा अधिकार आहे, याद्वारे राज्यघटनेच्या मूलभूत तत्त्वाचं पालन होतं, असं न्यायालयानं सांगितलं.

SIR ला कायदेशीर मान्यता आहे, त्यामुळे इतर पुनरीक्षणापेक्षा SIR ची प्रक्रिया वेगळी आहे एवढ्याच कारणामुळे ते अवैध ठरत नाही, तसंच निवडणूक आयोगाने अधिकारांचं उल्लंघन केलं असाही त्याचा अर्थ होत नाही, असं न्यायालयाने सांगितलं. SIR मुळे

नागरिकत्व रद्द होतं हा याचिकाकर्त्यांचा दावा न्यायालयानं फेटाळून लावत निवडणूक प्रक्रिया ही यांत्रिक प्रक्रिया नसून मतदारयाद्यांची अचूकता आणि विश्वासार्हतेवर अवलंबून आहे, असं नमूद केलं. तसंच याआधी मतदारयाद्यांचं सखोल पुनरीक्षण चाळीस वर्षांपूर्वी झालं असून या दरम्यान मतदारयाद्यांमधे त्रुटी निर्माण झाल्या आहेत, त्यामुळे पुनरीक्षण प्रक्रियेची गरज आहे, हे निवडणूक आयोगाने दिलेलं कारण न्यायालयाने मान्य केलं.

<><><><>

देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना आज आदराजंली वाहण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशातून नेहरू यांना आदरांजली वाहिली. नवी दिल्लीत शांतिवन इथं पंडित नेहरूंच्या समाधीस्थळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी तसंच इतर अनेक नेत्यांनी पुष्पांजली अर्पित केली. लोकसभेचे सभापती ओम बिरला यांनी देखील प्रथम प्रधानमंत्र्यांना आदरांजली वाहिली आहे.

<><><><>

आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम यंदा कोलकाता इथं होणार आहे. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज योगदिनापूर्वी खजुराहो इथं आयोजित कार्यक्रमात ही माहिती दिली. “निरोगी वयोवृद्धीसाठी योग” ही यंदाच्या योग दिनाची संकल्पना असल्याचं त्यांनी सांगितलं. निरोगी आणि आजारमुक्त वृद्धत्वासाठी योग दैनंदिन जीवनाचा भाग बनवण्याचं आवाहन जाधव यांनी केलं. यावेळी योग पार्क उपक्रम, ‘योग संगम’ पोर्टल आणि योग दिवसानिमित्त नव्या टी-शर्ट डिझाइनचंही अनावरण करण्यात आलं.

<><><><>

देशाच्या विविध भागांमध्ये वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना शक्य तितकी खबरदारी घेण्याचं आवाहन केलं आहे. उष्णतेमुळे दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या अडचणींमध्ये सध्या वाढ झाली असून त्यासाठी शक्य ती सर्व काळजी घ्यावी, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. उष्णतेचा आघात टाळण्यासाठी भरपूर पाणी प्यावं, दुपारच्या कडक उन्हात शक्यतो बाहेर जाणं टाळावं आणि विश्रांती घेण्याचा सल्लाही मोदी यांनी दिला आहे. प्राणी पक्ष्यांसाठी घराबाहेर, गच्चीवर,

दुकानं तसंच कार्यालयांच्या बाहेर पाण्याने भरलेलं भांडं ठेवण्याचं आवाहनही त्यांनी केलं आहे. या कठीण दिवसांमध्ये सर्वांनी संवेदनशीलता दाखवावी, असंही मोदी म्हणाले आहेत.

**<><><><><>**

देशाच्या काही भागात ईद अल अझ्हा म्हणजेच बकरीदचा सण साजरा करण्यात आला. जम्मू आणि काश्मीरमधे बकरी ईद निमित्त विशेष नमाजचं आयोजन करण्यात आलं होतं.

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी बकरी ईदनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण त्याग, करुणा आणि परोपकाराचा संदेश देतो, असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

सिक्कीमध्ये राजधानी गंगटोक इथे आज संध्याकाळी होणाऱ्या सिक्कीम विद्यापीठाच्या सातव्या दीक्षांत सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. राज्यपाल ओम प्रकाश माथुर आणि मुख्यमंत्री प्रेम सिंह तामांग देखील या समारंभाला उपस्थित राहतील. या सोहळ्यात ३३ विभागांमधून सुमारे १४ हजार पदव्या प्रदान करण्यात येतील, तर २८५ गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्ण आणि रौप्य पदकं मिळणार आहेत.

**<><><><><>**

इस्रायलने गाझा शहरावर काल रात्री केलेल्या हल्ल्यात हमासचे लष्करी कमांडर मोहम्मद ओदाह मारले गेल्याचं इस्रायलने म्हटलं आहे. हमाससाठी हा मोठा धक्का असल्याचं इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्राएल कात्झ म्हणाले. शीन बेट ही इस्रायली गुप्तचर संस्था आणि इस्रायल संरक्षण दल ओदाह यांच्या अनेक महिन्यांपासून मागावर होते, त्यानंतर ही कारवाई करण्यात आली. हमासनेही ओदाह, त्यांची पत्नी आणि मुलगा हल्ल्यात मारले गेल्याचं म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशात आतापर्यंत इबोलाच्या एकाही रुग्णाची नोंद झाली नसल्याचं केंद्र सरकारने स्पष्ट केलं आहे. आफ्रिकेतल्या काही भागांमध्ये अलिकडेच झालेल्या प्रादुर्भावानंतर इबोलासंदर्भातल्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने म्हटलं आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, राज्य सरकारांशी समन्वय साधून सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याचंही मंत्रालयाने म्हटलं आहे.

नागरिकांना घाबरून जाऊ नये तसंच, चुकीची माहिती पसरवणे टाळावं आणि माहितीसाठी केवळ अधिकृत स्रोतांवर अवलंबून राहण्याचं आवाहन मंत्रालयाने केलं आहे.

दरम्यान, रशियातल्या शास्त्रज्ञांनी इबोला विषाणूच्या नवीन प्रकाराला रोधक अशी लस विकसित केल्याचं दक्षिण आफ्रिकेतल्या रशियन दूतावासाने म्हटलं आहे.

<><><><>

नीट पेपरफुटीप्रकरणी सीबीआयने आज पुणे आणि लातूर इथून आणखी दोघांना अटक केली. डॉ. मनोज शिरूरे आणि तेजस शाह अशी त्यांची नावं आहेत. मनोज शिरूरे याने तीन विद्यार्थ्यांना रसायनशास्त्राच्या पेपरमधले प्रश्न पुरवले तर तेजस शाह याने मनिषा हवालदारकडून भौतिकशास्त्राचा पेपर घेतल्याचा त्यांच्यावर संशय आहे. या प्रकरणात सीबीआयने आतापर्यंत दिल्ली, जयपूर, गुरूग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि अहिल्यानगर इथून १३ जणांना अटक केली आहे.

<><><><>

गुजरातमधे कच्छच्या किनाऱ्यावर तटरक्षक दलाने स्थानिक पोलिसांबरोबर केलेल्या कारवाईत अमली पदर्थांचा मोठा साठा जप्त केला. जप्त केलेल्या मालाची आंतरराष्ट्रीय बजारपेठेतली किंमत सुमारे २०० कोटी रुपये असल्याचं गुजरात पोलिसांच्या सूत्रांनी सांगितलं. याप्रकरणी पुढचा तपास सुरु आहे.

<><><><>

भारतीय लष्करात अग्निपथ योजना आणि नियमित संवर्गा अंतर्गत भरतीसाठी १ जून ते १२ जून या कालावधीत ऑनलाईन प्रवेश परीक्षा होणार आहे. लष्कर भरती अधिकारी कर्नल रजत सुवर्णा यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. ही परीक्षा आंध्रप्रदेशातल्या अनंतपूर, गुंटूर, वायएसआर कडप्पा, कुरनूल, नादयाल, एसपीएस नेल्लोर, प्रकाशम, तिरुपती, विशाखापट्टणम, विजयनगरम, श्रीकाकुलम, काकीनाडा, राजामुंद्री आणि एनटीआर जिल्ह्यात होईल. प्रवेश परीक्षेत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना शारीरीक चाचणी आणि कागदपत्र पडताळणीसाठी गुंटूर आणि विशाखापट्टणम इथं लष्कर भरती कार्यालयात बोलावलं जाईल, असं कर्नल रजत सुवर्णा यांनी सांगितलं.

<><><><>

कॅनडा दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी टोरोंटो येथे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी कॅनडातले वरिष्ठ नेते, व्यावसायिक आणि गुंतवणूकदारांबरोबर अनेक उच्चस्तरीय बैठका घेतल्या. द्विपक्षीय सहकार्य अधिक दृढ करणं आणि धोरणात्मक क्षेत्रांमध्ये गुंतवणूक आणि तंत्रज्ञान भागीदारीला प्रोत्साहन देणं यांच्यातल्या वाढत्या पूरकतेविषयी या बैठकांमध्ये चर्चा झाल्याचं, वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटलं आहे. या दौऱ्यात गोयल यांनी कॅनडाचे आंतरराष्ट्रीय व्यापार मंत्री मनिंदर सिद्धू यांची भेट घेतली.

<><><><>

अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात स्वयंघोषित अध्यात्मिक गुरू आसारामला राजस्थान उच्च न्यायालयाकडून आज अंशतः दिलासा मिळाला आहे. न्यायालयाच्या द्विसदस्यीय पीठानं, त्याची सामूहिक लैंगिक शोषण, 'पोक्सो' कायद्यांतर्गत येणारे सामूहिक लैंगिक शोषणाचे गंभीर गुन्हे आणि गुन्हेगारी कट रचण्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता केली आहे.तथापि, भारतीय दंड संहितेअंतर्गत अल्पवयीन मुलीचं लैंगिक शोषण केल्याच्या आरोपाखाली त्याला झालेली शिक्षा उच्च न्यायालयानं कायम ठेवली आहे. त्यामुळे आसारामची जन्मठेपेची शिक्षा पुढेही सुरूच राहणार आहे. आसारामला तात्काळ शरण येण्याचे आदेश, उच्च न्यायालयानं दिले आहेत. तो सध्या तात्पुरत्या जामिनावर बाहेर असून, याच आठवड्याच्या सुरुवातीला त्याच्या जामिनात आणखी सात दिवसांची वाढ करण्यात आली होती.

<><><><>

तृतीयपंथीयांच्या हक्क संरक्षण सुधारणा कायदा २०२६ला आव्हान देणाऱ्या सर्व याचिका सर्वोच्च न्यायालयात वर्ग करण्याची विनंती केंद्र सरकारनं केली आहे. विविध उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या या याचिकांवरून 'हस्तांतरण याचिका' दाखल केल्याची माहिती, केंद्र सरकारनं आज सर्वोच्च न्यायालयात  दिली.

सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील पीठासमोर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी हा विषय मांडला आणि या  याचिकांवर येत्या शुक्रवारी सुनावणी घेण्याची विनंती केली. मात्र, सरन्यायाधीशांनी या विषयाची सुनावणी उच्च न्यायालयांकडून होण्याचे काही फायदेही असू शकतात, असं सूचित केलं. त्यावर उत्तर देताना तुषार मेहता

म्हणाले की, एकाच वेळी अनेक उच्च न्यायालयांमध्ये या प्रकरणावर सुनावणी सुरू असल्यानं परस्परविरोधी निर्णय येण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.

तृतीयपंथीयांना लिंग निवडीचा अधिकार नाकारल्यामुळे या सुधारणा कायद्याला आव्हान दिलं जात आहे. या संदर्भात दाखल झालेल्या मुख्य याचिकांवर सर्वोच्च न्यायालयानं या महिन्याच्या सुरुवातीलाच केंद्र सरकारला नोटीस बजावली आहे.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेटमधे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने काल धरमशाला इथं  गुजरात टायटन्सला ९२ धावांनी हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला.

**<><><><>**

प्रसिद्ध क्रीडा प्रशासक आणि नेमबाज रणधीर सिंग यांचं आज नवी दिल्लीत वार्धक्याने निधन झालं. ते ७९ वर्षांचे होते. श्वसनाच्या त्रासामुळे गेले काही दिवस त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते. अर्जून पुरस्काराने सन्मानित रणधीर सिंग यांनी १९७८च्या आशियाई क्रीडास्पर्धांमधे सुवर्णपदक मिळवलं होतं. इंडियन ऑलिंपिक असोसिएशनचे महासचिव म्हणून तर इंटरनॅशनल ऑलिंपिक कमिटीचे सदस्य म्हणून त्यांनी काम केलं होतं. ऑलिंपिक काऊन्सिल ऑफ आशिया या संघटनेचे  अध्यक्ष म्हणून २०२४मधे ते निवडून आले होते. मात्र अलिकडेच त्यांनी प्रकृतीच्या कारणास्तव राजीनामा दिला होता.

**<><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पावसाचं केरळातलं आगमन लांबणीवर पडलं आहे. यापूर्वीच्या अंदाजानुसार काल मान्सून केरळात पोहोचण्याची शक्यता होती. मात्र केरळ आणि लक्षद्वीपमधल्या किमान ६० टक्के निरीक्षण केंद्रांमधे दोन दिवस सलग अडीच मिलीमीटर पाऊस झाला की मान्सूनचं आगमन झाल्याची घोषणा केली जाईल असं हवामान विभागानं सांगितलं आहे.

**<><><><>**

मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश तसंच ईशान्येकडील काही भागांत तीव्र उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात विदर्भातील अमरावती, वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये आज उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. ब्रह्मपुरी, गडचिरोली, चंद्रपूर आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये काल ४६ अंश सेल्सिअसपर्यंत तापमानाची नोंद झाली. हवामान विभागाने

रविवारपर्यंत बिहार, कर्नाटक आणि ईशान्य भारताच्या काही भागांत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

**//<><><><><>//**